POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३३० ● मुंबई, मंगळवार, ०१ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.


MARATHI EKIKARAN BATMIPATRA




## मराठीसाठीचा ५ जुलैचा मोर्चा रद्द
## पण ठाकरे बंधुंचा 'फॉर्म्युला'!

**■मुंबई । प्रतिनिधी :**

हिंदी भाषेचा शालेय अभ्यासक्रमामध्ये पहिल्या इयत्तेपासून समावेश करण्यासंदर्भातील दोन शासन आदेश रद्द करत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी सायंकाळी पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला केली. राज ठाकरेंची महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनं हिंदीच्या सक्तीविरोधात रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्याचा इशारा दिलेला. ५ जुलै रोजी गिरगाव ते आझाद मैदान असा संयुक्त मोर्चा काढण्याची घोषणा मनसे आणि शिवसेनेनं केली होती. मात्र आता शासनाने हा वादग्रस्त आदेश मागे घेतल्याने हा मोर्चा होणार नाही असं राज ठाकरेंनी निर्णयानंतर आपल्या सोशल मिडिया अकाऊंटवरुन केलेल्या पोस्टवरुन स्पष्ट झालं. मात्र असं असलं तरी शासनाच्या निर्णयानंतर आणखी एका पोस्टने सवाचं लक्ष वेधून घेतलं आहे.



**ती पोस्ट चर्चेत...**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसंदर्भात वार्तांकन करणाऱ्या मनसे वृत्तांत अधिकृत या पेजवरुन एक पोस्ट करण्यात आली आहे. "५ जुलै, मराठी एकजुटीचा विजयोत्सव ! ठाकरे," अशा कॅप्शनसहीत एक फोटो पोस्ट करण्यात आला आहे. 'मराठी = ठाकरे' असा फॉम्युर्ला या फोटोवर लिहिलेला असून फोटोच्या मध्यभागी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंचा फोटो आहे. फोटोत डावीकडे उद्धव ठाकरे आणि उजवीकडे राज ठाकरेंचा फोटो आहे. 'आम्ही येतोय, तुम्ही येताय ना?' असा सवाल समर्थकांना विचारण्यात आला आहे.

**मोर्चा रद्द तरी 5 तारखेला एकत्र येणार ठाकरे?**

उद्धव ठाकरे यांनी ५ जुलैचा मोर्चा रद्द झाला असला तरी जल्लोष केला जाणार सभा किंवा मेळावा घेतला जाणार त्यामध्ये सगळ्यांनी सहभागी व्हावं अस आवाहन केलेल आहे. या जल्लोषासाठी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार का? याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागून राहिलं आहे. मुंबईतील मराठी शक्तीची एकजुट दाकवून देऊ या उद्धव ठाकरेंच्या आवाहनाला मनसेकडून कसा प्रतिसाद द्यायचा याबाबतची रणनीती आज होत असलेल्या मनसेच्या बैठकीमध्ये ठरवली जाणार आहे. हिंदी सक्तीचा निर्णय रद्द झाल्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज महत्त्वाची बैठक बोलावली आहे. मनसेचे नेते, सरचिटणीस आणि प्रमुख पदाधिकारी राहणार बैठकीसाठी उपस्थित आहेत. बाळा नांदगांवकर, अविनाश जाधव, संदीप देशपांडे आणि अविनाश अभ्यंकर यासारखे मनसेचे नेते बैठकीला हजर आहेत.

**ठाकरेंकडून मविआला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न**

एकीकडे ठाकरेंची शिवसेना आणि मनसेच्या युतीचे प्रयत्न सुरु आहेत. त्यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे आज दुपारी १२ वाजता पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजाच्या पहिल्या दिवशीच विधान भवनात येणार आहेत. पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे १२.४५ वाजता आझाद मैदानात जनसुरक्षा विधेयकाविरोधातील मोर्चात सहभागी होणार आहेत. उद्धव ठाकरे दुपारी अडीच वाजता वाय बी चव्हाण सेंटर येथे जाणार आहेत. तिथून दुपारी तीन वाजता उद्धव ठाकरे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासोबत एकाच गाडीतून सिल्वर ओक बंगल्यावर जाऊन आगामी स्थानिक निवडणुकांवर चर्चा करण्याची शक्यता आहे. या भेटीतून महाविकास आघाडीला नवसंजीवनी देण्याचा ठाकरेंचा प्रयत्न आहे.

## विरोधकांचे आंदोलन की रणनिती
## हिंदीच्या मुद्यावरून फडणवीस सरकारचा यू-टर्न का?

**■मुंबई । प्रतिनिधी :**



महाराष्ट्र विधानसभेचे पावसाळी अधिवेशन आज, अर्थात सोमवार ३० जून पासून सुरू होणार आहे. मात्र त्यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने शाळेत पहिलीपासून हिंदी भाषा शिकवणे सक्तीचे करण्याचा निर्णय मागे घेतला आहे. महाराष्ट्र सरकारचा हा निर्णय केवळ शैक्षणिक बाबींशीच नव्हे तर राजकीय आणि सामाजिक दबावांशी देखील संबंधित एक मोठे पाऊल मानले जात आहे, कारण राज्यातील शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसेचे राज ठाकरे हा मराठी अस्मितेचा मुद्दा बनवन येत्या यांनी ५ जुलै रोजी मोर्चाचे आवाहन केले होते. महाराष्ट्राच्या राजकारणात बऱ्याच काळानंतर ठाकरे बंधू अर्थात उद्धव आणि राज ठाकरे या मुद्द्यावर एकत्र आले आहेत. त्यांच्या एकत्र येणाच्या शक्यतेमुळे राज्यात निर्माण झालेल्या वातावरणामुळे सरकारला आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करावा लागला. सरकारच्या निर्णयानंतर, विरोधी पक्षांनी 5 जुलै रोजी मुंबईत होणारा मोर्चा रद्द करण्याची घोषणा केली आहे आणि त्याला मराठी अस्मितेचा विजय म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांनी आता ५ जुलै रोजी विजय मार्च काढला जाईल अशी घोषणा केली.

**हिंदीच्या मुद्यावर फडणवीस सरकारचा यू-टर्न**

राज्य सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरण अंतर्गत त्रिभाषिक सूत्र लागू करून हिंदी सक्तीची करण्याची घोषणा केली होती, परंतु सततचे निषेध, विरोधी पक्षांची आक्रमक भूमिका आणि मराठी अस्मितेच्या मुद्द्यामुळे सरकारला निर्णय बदलावा लागला. त्यामुळे सरकारने १६ एप्रिल आणि १७ जून २०२५ रोजी जारी केलेले दोन्ही सरकारी आदेश रद्द केले आहेत. तसेच त्रिभाषा धोरणाबाबत पुढील पाऊल तज्ञ समितीच्या अहवालानंतरच ठरवले जाईल असंही स्पष्ट करण्यात आलं.

**फडणवीस सरकारने निर्णय का केला रद्द?**

**जनतेचा तीव्र निषेध आणि राजकीय दबावामुळे महाराष्ट्र सरकारने पहिलीच्या वर्गापासून हिंदी भाषा शिकवण्याचा निर्णय मागे घेतला. फडणवीस सरकारने यू-टर्न का घेतला आणि हा निर्णय का रद्द केला याची कारणं 5 मुद्यांत समजून घेऊना...**

- **विरोधी पक्षाचे आंदोलन :** शिवसेना (ठाकरे गट), मनसे, काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी सरकारने घेतलेल्या या निर्णयाचा निषेध करत जोरदार विरोध करत प्रचार केला. दीर्घकाळापासून एकमेकांचे प्रतिस्पर्धी असलेले ठाकरे बंधू (उद्धव ठाकरे) आणि मनसे प्रमुख राज ठाकरे, हेही या मुद्यावर एकत्र येताना दिसले. या दोन्ही पक्षांनी येत्या 5 जुलै रोजी मुंबईत भव्य मोचार्चे आवाहन केले होते. तर महाराष्ट्रातील दुसरा विरोधी पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (एनसीपी) चे नेते शरद पवार यांनीही शिवसेना ठाकरे गट आणि राज ठाकरे यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. त्यामुळे या मुद्यावरुन सर्व विरोधी पक्ष एकवटले आणि सरकारला हेच नको होतं. शिवसेना ठाकरे गटाने तर "हिंदी पुस्तकांची" होळी करत प्रतीकात्मक निषेधही केला, ज्यामुळे सरकारवरील दबाव आणखी वाढला. त्यामुळे अखेर सरकारने हे पाऊल उचललं. मराठी माणसाच्या एकटजुटीपुढे, शक्तीपुढे सरकारची शक्ति हरल्याचे सांगत हा विजय मराठी माणसाचा,मराठी भाषेचा आहे असे ुद्धव ठाकरे म्हणाले. मराठी लोकांमध्ये फूट पाडण्यात सरकार अपयशी ठरल्याचे त्यांनी नमूद केलं.
- **मराठी अस्मितेचा प्रश्न :** महाराष्ट्रात शाळांमध्ये हिंदीचे सक्तीचे शिक्षण हा मुद्दा विरोधी पक्षांनी मराठी भाषा, संस्कृती आणि ओळखीशी जोडला. त्यामुळे अनेक लोकंही त्याच्याशी खूप जोडले गेले. जेव्हा सरकारने पहिलीपासून हिंदी शिकवण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्याकडे ‖मराठीवर हिंदी लादणे‖ अशा अनुषंगातून पाहिले गेले. महाराष्ट्रात यापूर्वीही मराठी विरुद्ध हिंदी असा वाद अनेकदा पेटला आहे. बाळासाहेब ठाकरेंनीही अनेकदा मराठी असमितेचा मुद्दा उचलून धरला होता. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही मराठी अस्मितेचा मुद्दा उपस्थित केल्याचे अेकदा दिसून आले आहे आणि त्यामळेच राजकीय दृष्टिकोनातून अतिशय संवेदनशील आहे.
- **समाजातील व्यापक विरोध :** ६-७ वर्षांच्या एवढ्या लहान मुलांवर दुसरी भाषा लादल्याने त्यांच्यावर अनावश्यक ओझे पडे, असे अनेक शिक्षणतज्ज्ञ, पालक आणि मराठी संघटनांचे म्हणणे आहे. या मुद्यावरून सोशल मीडिया आणि सार्वजनिक व्यासपीठांवरूनही सरकारवर बरीच टीका झाली. अनेक संघटना आणि राजकीय पक्षांनी याला ‖भाषिक आक्रमण‖ म्हणत निषेध करण्यास सुरुवात केली.
- **महाराष्ट्रातील महापालिका निवडणुका :** गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (सपा) आणि शिवसेना (ठाकरे गट) या महाआघाडीला मोठी आघाडी मिळाली होती, परंतु विधानसभा निवडणुकीत महाआघाडीला मोठा धक्का बसला आणि भाजपने १३२ जागा, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ५७ तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ४१ जागा जिंकल्या. अशाप्रकारे, नोव्हेंबरमध्य झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने २३० जागा जिंकल्या, तर काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाविकास आघाडी (टश्अ) युतीला केवळ ४६ जागांवर समाधान मानावे लागले. आता महाराष्ट्रात पुन्हा महानगरपालिका निवडणुका होणार आहेत. अशा परिस्थितीत हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून जनतेत रोष पसरत होता. विरोधक हा मुद्दा चिघळवत होते. त्यामुळे आगामी निवडमुका डोळ्यांसमोर ठेवून, आणि हा मुद्दा आंदोलनात रूपांतरित होण्यापूर्वीच सरकारने हा निर्णय मागे घेतला.
- **त्रिभाषा सूत्रावरून गोंधळ :** राज्य सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरण (ठएढ) अंतर्गत त्रिभाषा सूत्र लागू करण्याची योजना आखली होती. परंतु हिंदी भाषेसह मुलांना कोणते पर्याय मिळतील हे स्पष्ट केले गेले नाही, ज्यामुळे गोंधळ आणि असंतोष निर्माण झाला. विरोधकांच्या निषेधाच्या पार्श्वभूमीवर, रविवारी महाराष्ट्र मंत्रिमंडळाची हिंदी भाषा सक्तीच्या करण्याबाबत बैठक झाली. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली की सरकारने 16 एप्रिल आणि १७ जून २०२५ चे दोन्ही सरकारी ठराव (जीआर) रद्द केले आहेत. आता या विषयावर एक तज्ज्ञ समिती स्थापन केली जाईल, ज्याचे अध्यक्ष शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव असतील, असे ते म्हणाले. त्रिभाषा सूत्र कसे आणि कोणत्या वर्गापासून लागू करायचे आणि विद्यार्थ्यांना कोणते पर्याय द्यायचे हे, ही समिती ठरवेल.

## मराठी भाषेबाबत तडजोड करणार नाही
## मराठीची गळचेपी सहन करणार नाही : एकनाथ शिंदे

**■मुंबई । प्रतिनिधी :**

मराठी भाषेबाबत आपण कधीही तडजोड सहन करणार नाही, मराठीची गळचेपी सहन करणार नाही असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मराठी माणसाच्या उद्धारासाठी जे काही करायचं ते आपण करणार, दिलेला शब्द आपण पाळतो त्यामुळे मराठी माणूस आपल्यासोबत आहे असंही शिंदे म्हणाले. मुंबईत शिवसेनेच्या कार्यकारिणीची बैठक पार पडली. मराठी माणसाच्या हक्कासाठी शिवसेना नेहमी आग्रही असल्याचा ठराव त्यामध्ये संमत करण्यात आला.

एकनाथ शिंदे यांची शिवसेनेच्या मुख्य नेतेपदी निवड करण्यात आली. त्यावेळी शिंदेंनी कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना कानमंत्र दिला. आपल्यात शिवसैनिक हे पद सर्वात मोठं आहे हे लक्षात ठेवा. कार्यकर्ता हा नेता तयार करतो, पक्ष घडवतो. त्यामुळे कार्यकर्त्यालां जपले पाहिजे असं शिंदे म्हणाले. नेता, आमदार, मंत्री झालो ही हवा डोक्यात जाऊ देऊ नका, कायम कार्यकर्ता म्हणूनच काम करा असा सल्ला एकनाथ शिंदे यांनी दिला. एकटा माणूस मोठा होऊन पक्ष मोठा होत नाही. कार्यकर्त्यालां मोठं केलं की पक्ष-ही आपोआप मोठा होतो असंही ते म्हणाले.

**शिवसेनेत निवडणुका होणार**

एकनाथ शिंदे म्हणाले की, "शाखाप्रमुखापासून तर मुख्य नेत्यापर्यंत सर्वांनाच निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे. पक्षाचे सक्रिय सदस्य हेच मतदार असतील. डिजिटल म्हणजे ऑनलाईन पद्धतीने आणि प्रत्यक्ष मतदान पद्धतीने अशा ७ टप्प्यात ही निवडणूक होणार आहे. कुठेही लपवाछपवी नाही, किंवा कुणाचे नेतृत्व लादण्याचा प्रयत्न होणार नाही. ही निवडणूक ऐतिहासिक होणार आहे. संपूर्ण पारदर्शक पद्धतीने, निःपक्षपाती पद्धतीने निवडणुका होतील. मी मुख्य नेता असलो तरी आज निवडणुकीला रीतसर सामोरा जाणार. शाखाप्रमुख असो किंवा मुख्यनेता लोकशाहीत सगळे चा समान आहे."



**मंत्र्यांना शिंदेंच्या कानपिचक्या**

एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या भाषणात शिवसेनेच्या मंत्र्यांना आणि आमदारांना कानपिचक्या दिल्या. ते म्हणाले की, आपण कमी बोलू आणि जास्त काम करू तेवढं चांगलं. विरोधकांना एक्स्पोज करताना स्वतः एस्पोज होऊ नका. तुमचा चुकीचा शब्द पक्षाला अडचणीत आणतो. आपण एवढं मोठं यश मिळवलं ते चुकीचं बोलून घालवू नका. शिस्तीला तडा जाईल असं काही करू नका. केलेल्या कामांची ब्रेकिंग न्यूज व्हायला पाहिजे.

## छत्रपती संभाजीनगरात शिवसेना यूबीटीच्या नेत्याकडून शेतकऱ्याला मारहाण



**■छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :**

राज्यात गुन्हेगारी प्रकरणांमध्ये दिवसागणिक वाढ होत असून अनेक प्रकरणांमध्ये स्थानिक नेत्यांकडून कायदा हातात घेतल्याचं पाहायला मिळत आहे. नुकत्याच समोर आलेल्या माहितीनुसार छत्रपती संभाजीनगर इथं एका शिवसेना यूबीटीच्या सचिन घायाळ यांच्याकडून एका शेतकऱ्याला मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. ऊसाचे थकीत बिल मागितल्याच्या रागातून ही मारहाण करण्यात आली. शेतकऱ्याला घरी बोलावून मारहाण केल्याची प्राथमिक माहिती समोर आली. मारहाणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पैठण पोलिसांत सचिन घायाळसह चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. सचिन घायाळ असं मारहाण करणाऱ्या ठाकरे गटाच्या उपनेत्याचं नाव असून, राहुल कांबळे असं मारहाण झालेल्या शेतकऱ्याचं नाव आहे. शेतकऱ्याला घायाळसह चौघांकडून मारहाण केल्याचा आरोप असून, आता पोलीस या प्रकरणात पुढील तपास करत आहेत. दरम्यान काही दिवसांपूर्वीच छत्रपती संभाजीनगर येथे अशाच एका धक्कादायक घटनेनं खळबळ माजली होती. जिथं महिला किर्तनकाराच्या डोक्यात दगड घालून तिची निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याचा भयंकर प्रकार घडला होता. सध्या महाराष्ट्रात आषाढी वारीचा उत्साह सुरू असताना महिला किर्तनकाराचा खून करण्यात आल्याच्या प्रकाराने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## 'तुम्हाला भाऊ-बहीण मिळवून देतो' जाहिरातीला भुलल्या आजी...




**■मुंबई । प्रतिनिधी :**

मुलं परदेशात असताना किंवा आई-वडिलांपासून दूर असताना त्यांना एकटेपणा खात असतो. अशावेळी आपल्याशी बोलणार, आपलं ऐकून घेणारं कोणीतरी असावं असं वयोवृद्ध आई-वडिलांना वाटणं सहाजिक आहे. मात्र असा आधार शोधत असताना माहितीच्या आभावी असे वृद्ध लोक आर्थिक फसवणुकीलाही बळी पडण्याची शक्यता असते. असाच एक विचित्र प्रकार मुंबईमध्ये समोर आला असून एका वयोवृद्ध महिलेला लाखो रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे. भाऊ शोधण्याच्या नादात या महिलेला मोठा आर्थिक फटका बसला असून हा प्रकार अनेकांना धडा घेण्यासारखा आहे असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही, नेमकं घडलंय काय ते पाहूयात...

अँटॉप हिल परिसरात राहणारी महिला युट्युबवर व्हिडीओ पाहत होती. यादरम्यान एक जाहिरात तिच्या नजरेस पडली. 'तुम्हाला भाऊ-बहीण किंवा अन्य कुणी नातेवाईक हवा असल्यास आम्ही मिळवून देऊ,' असे जाहिरातीमध्ये नमूद केले होते. लंडनमध्ये राहणाऱ्या सूरज सिंग याच्यासोबत भावाचे नाते जोडायला मला आवडेल, असे महिलेने जाहिरातीमधील क्रमांकावर फोन करून सांगितले. त्यानंतर सूरज सिंग या नावाने महिलेला फोन आला आणि दोघेही एकमेकांसोबत चॅटिंग करू लागले, फोनवर बोलू लागले. काही दिवसांनी महिलेला सूरजचा फोन आला. 'मी भारतात आलो असून परकीय चलन असल्याने दंड भरल्याशिवाय कस्टम अधिकार सोडत नाहीत' असे त्याने सांगितले कधी कस्टम अधिकारी, जीएस अधिकाऱ्याच्या नावे महिलेकडून 5 लाख 80 हजार रुपये उकळले.

**लंडन कनेक्शन**




मध्य मुंबईत वास्तव्यास असलेल्या एका ६० वर्षीय महिलेला बंधुशोध चांगलाच महागात पडला आहे. 'नातेवाईक कुणी नसेल तर आम्ही आहोत, आम्ही तुम्हाला नातेवाईक मिळवून देतो' अशी जाहिरात पाहून वृद्धेने एका व्यक्तीला संपर्क केला. लंडनला तिला एक भाऊ सापडला. मात्र, परकीय चलनासह विमानतळावर पकडण्यात आल्याचे सांगून या आभासी भावाने वेगवेगळी कारणे पुढे करून वृद्धेकडून ११ लाख रुपये उकळले.

**वेगवेगळ्या यंत्रणांच्या नावाने पैशासाठी फोन**

वेगवेगळ्या यंत्रणांच्या नावाने पैशासाठी फोन येत असल्याने वृद्ध महिलेने पैसे देण्यास नकार दिला. त्यावेळी 'सूरज हा तुमच्या संपर्कात असल्याचे समोर आले असून यामुळे तुम्हाला आणि तुमच्या पतीला अटक होईल' अशी भीती दाखविण्यात आली. त्यामुळे घाबरलेल्या महिलेने पैसे पाठविणे सुरूच ठेवले. जवळपास अकरा लाख रुपये पाठविल्यानंतर तिने हा सर्व प्रकार आपल्या मुलीला सांगितला. त्यावेळी ही सायबर फसवणूक असल्याचे सांगत तिने आईला सायबर पोलिसांकडे तक्रार करण्यास सांगितले. त्यानुसार या महिलेनं तक्रार केली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## २ कोटी ८९ लाख खात्यावरुन क्षणात गायब

तंत्रज्ञानामुळे आयुष्य सुखकर झालं आहे. किराणामाल असो किंवा खाद्यापदार्थ असो सर्व काही स्मार्टफोनच्या माध्यमातून अवघ्या काही मिनिटांमध्ये बसल्या जागी मागवता येतं. आर्थिक व्यवहारांपैकी बऱ्याच गोष्टी आता ऑनलाइनच केल्या जातात. मात्र ज्या प्रमाणे स्मार्टफोन हे वरदान आहे त्याचप्रमाणे हे वरदान अनेकदा श्रापही वाटतं. असाच काहीसा प्रकार मुंबईमध्ये एका वयस्कर महिलेसोबत घडला. या महिलेला २ कोटी ८९ लाखांचा गंडा घालण्यात आला आहे.

**९ दिवस घालता गेला गंडा**

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील पश्चिम उपनगरातील ७० वर्षीय महिलेला हा डिजिटल गंडा घालण्यात आला आहे. ही महिला डॉक्टर असून तिला डिजिटल अरेस्टच्या जाळ्यात अडकून दोन कोटी ८९ लाख रुपयांची फसवणूक झाली आहे. ही घटना २८ मे ते ५ जूनदरम्यान घडली आहे. याप्रकरणी सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास ते करत आहेत.

**नेमकं या आर्जीसोबत घडलं काय?**

फसवणूक करण्यात आलेल्या महिला डॉक्टरला २८ मे रोजी अमित कुमार नावाच्या व्यक्तीचा कॉल आला. त्याने आपण टेलिकॉम विभागातील अधिकारी असल्याचे सांगत, त्यांच्या आधार कार्डाचा वापर करून नवीन सिम घेतले गेले असून, त्यावर गुन्हा दाखल झाला आहे, असे त्यांना सांगितले. यानंतर त्यांना व्हॉट्सअॅप कॉलवर आयपीएस अधिकारी समाधान पवार यांचा कॉल आल्याचे भासवत त्यांच्यावर नरेश गोयल यांच्या मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात सहभाग असल्याचा आरोप करण्यात आला. यानंतर त्यागी नावाच्या पोलिस गणवेशातील व्यक्तीने व्हिडीओ कॉलद्वारे संपर्क साधत, 'तुम्ही आमच्या निगराणीखाली आहात,' असे सांगून दर तासाला हजेरी लावण्याची सूचना दिली.

**चौकशीच्या बहाण्याने मागितले पैसे**

शेवटी, सर्व पैसे तपासासाठी एका स्वतंत्र खात्यात ट्रान्स्फर करा, चौकशी पूर्ण झाल्यावर परत केले जातील, असे सांगून डॉक्टरकडून एकूण दोन कोटी ८९ लाख रुपये उकळण्यात आले. या महिलेने खात्यावर पैसे टाकताच ते गायब झाले. अखेर त्यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. पोलीस आता या प्रकरणामध्ये तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरु केला आहे.

**डिजिटल अरेस्ट काय प्रकार असतो?**

सरकारी अधिकारी, पोलीस अधिकारी असल्याचं सांगून तुमच्यावर आमची २४ तास नजर असल्याचा दावा फसवणूक करणारे करतात. यासाठी वर्दीमध्ये व्हिडीओ कॉल करणे, धमकावणे, व्हिडीओ कॉलवर काही गोष्टी करण्यास भाग पाडलं जातं. त्यानंतर आर्थिक चाचपणी करण्याची आवश्यकता असल्याचं सांगून अमुक एक रक्कम जमा करण्यास सांगितलं जातं. तसं न केल्यास पोलीस कारवाई किंवा कायदेशीर कारवाईची भीती दाखवली जाते. पैसे ट्रान्सफर केले की या व्यक्तींचे फोन बंद होतात. अशाप्रकारे आपली फसवणूक झाली आहे हे समजेपर्यंत उशीर झालेला असतो. सरकारी यंत्रणांमधील अधिकारी जसे की सीबीआय, ईडी, आयकर अधिकारी यांबरोबरच पोलीसही अशाप्रकारे व्हिडीओ कॉल, फोन कॉलवर व्हेरिफिकेशन करत नाही. याबद्दल अनेकदा पोलिसांकडून जनजागृतीअंतर्गत माहिती दिली जाते तरीही अनेकजण याला बळी पडतात.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# अपात्रतेच्या भुताचे बस्तान

धारावी पुनर्विकास प्रकल्पाने (डीआरपी) नुकतीच पात्र-अपात्र झोपडीधारकांची प्राथमिक यादी अर्थात प्रारुप परिशिष्ट २ प्रसिद्ध केले. या पहिल्या यादीतील केवळ २५ टक्केच झोपडीधारक धारावीत मोफत घर मिळण्यास पात्र ठरले असून तब्बल ७५ टक्के झोपडीधारक अपात्र ठरले आहेत. हीच सरासरी इतर पात्रता यादीत कायम राहण्याची शक्यता धारावी बचाव आंदोलन समिति आणि इतर स्वयंसेवी संस्थांनी व्यक्त केल्याने धारावीतील रहिवाशांमध्ये भीतीची लाट पसरली आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत डीआरपी आणि नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडकडून मागील काही महिन्यांपासून सर्वेक्षण सुरू आहे. या सर्वेक्षणाअंतर्गत धारावीकरांची कागदपत्रे तपासून झोपडीधारकांची पात्रता निश्चित केली जात आहे. हे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात असतानाच प्राथमिक प्रारुप परिशिष्ट २ प्रसिद्ध करण्यात आले. या पहिल्या यादीत गणेश नगर, मेघवाडी झोपडपट्टीतील ५०५ झोपडीधारकांच्या घरांचा समावेश आहे. या यादीतील ५०५ पैकी फक्त २२८ झोपडीधारक आणि शाळा, धार्मिक स्थळे आदी ३८ बांधकामेच पात्र ठरली आहेत. त्यातही २२८ पैकी केवळ १०१ (सन २००० आधीचे) झोपडीधारकांनाच पात्रतेच्या निकषांनुसार धारावीत मोफत घर मिळणार असून उर्वरित ५९ झोपडीधारकांची धारावीबाहेरील भाडे तत्वावरील घरांत पाठवणी होईल. तर उरलेले झोपडीधारक धारावीतूनच हद्दपार होणार आहेत. पहिली यादी पाहता उर्वरित याद्यांमध्येही अतिशय कमी संख्येने धारावीकर धारावीतच घर मिळवण्यास पात्र ठरण्याची आणि इतर धारावीबाहेर ढकलले जाण्याची दाट शक्यता आहे. धारावीकरांना धारावीतून हुसकावून लावण्याचा हा डाव या यादीमुळे अतिशय स्पष्टपणे उघड होत आहे. या यादीवर हरकती-सूचना नोंदवण्याची व पात्रतेसाठी पुन्हा प्रयत्न करण्याची संधी धारावीकरांना देण्यात येईल, असे डीआरपीकडून सांगितले जात आहे. परंतु ही दुबार संधी फक्त नावापुरतीच असेल, यात शंका नाही. धारावी पुनर्विकास प्रकल्प जाहीर झाल्यापासून वादाच्या भोवर्यात सापडलेला आहे. त्यातच या प्रकल्पाचे कंत्राट अदानी समूहाच्या हाती गेल्यापासून धारावीकरांना कुणी वालीच उरलेला नाही, अशी परिस्थिती आहे. नाही म्हटले तर धारावी बचाव आंदोलन समिती आणि इतर स्वयंसेवी संस्थांनी वेळोवेळी या प्रकल्पाच्या पारदर्शकेवरून आवाज उठवला आहे. पात्रतेचे निकष, सर्वेक्षण, मास्टर प्लानमधील त्रुटींवर बोटही ठेवले. परंतु डीआरपीकडून धारावीकरांचा आवाज दडपण्याचाच प्रयत्न झाला. काँग्रेस, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाने धारावीकरांच्या लढ्याला पाठिंबा देत भव्य मोर्चा काढला. हा मोचार्ही विकासाच्या नावाखाली धारावीकरांच्या हक्काची जमीन हिसकावून घेर्णाया नफेखोरांना थांबवण्यात अशस्वी ठरला. या पुनर्विकास योजनेअंतर्गत, महायुती सरकार केवळ काही निवडक लोकांनाच विकास करण्यात मश्गुल आहे. मूळ धारावीकरांना बेघर करून त्यांची जागा विकासकाच्या घशात घातली जात आहे. धारावीची जागा कमी पडते म्हणून की काय पुनर्विकासाच्या नावाखाली मुंबई उपनगरातील शेकडो एकर जमीनही आंदण दिली जात आहे. मुद्रांक दरातील सवलतींचा वर्षावही सुरू आहे. धारावीतील झोपडीधारकांना चांगले, समृद्ध जीवन देण्याच्या बाता मारणारे महायुती सरकार प्रत्यक्षात इथे फक्त मोठे कॉर्पोरेट आणि त्यांच्या नातेवाईकांनाच भरभराटीला आणण्याच्या विचारात असल्याचे दिसते. धारावी ही केवळ झोपडपट्टी नसून असंख्य लहान लहान व्यवसायांचे केंद्र आहे. हजारो नव्हे तर, लाखो लोकांचे पोटपाणी येथील लघुव्यवसायांवर अवलंबून आहे. धारावीतील काही खाद्यपदार्थ, कातडी, कापडी, हँडक्राफ्ट आदी प्रॉडक्ट्स थेट परदेशातही पाठवलेले जातात. तळमजला, एक मजला, दुमजला आदी घरे-गाळ्यांमध्ये १३ लाख धारावीकरांचे वास्तव्य आहे. अशा सर्व धारावीकरांना धारावीतच हक्काची जागा मिळावी, घराच्या बदल्यात किमान ५०० चौ. फुटांचे घर आणि व्यावसायिक गाळ्याच्या बदल्यात दुप्पट आकाराचे व्यावसायिक गाळे मिळावेत. धारावीत मोठ्या प्रमाणात मोकळी जागा असल्याने एकाही धारावीकराला हद्दपार करू नये, बीडीडी चाळींच्या धर्तीवर धारावीचा विकास व्हावा, अशी येथील रहिवासी संघटनांची मागणी आहे. परंतु या सर्वच मागण्यांना धुडकावून लावत इथला पुनर्विकास प्रकल्प दामटला जात आहे. धारावीतील पुनर्विकास सर्वेक्षणानुसार फक्त तळमजल्यावरील रहिवाशांनाच ग्राह्य धरले जात असून अशा रहिवाशांची संख्या केवळ १ ते दीड लाखच आहे. त्यातही पात्र-अपात्रतेच्या खेळात यातील ५९ हजार झोपडीधारकच धारावीत मोफत घरे मिळवण्यात पात्र ठरतील, अशी शक्यता आहे. बहुतांश रहिवाशांनी एक किंवा दोन मजले वाढवलेले असल्याने या सर्व रहिवाशांना धारावीबाहेर भाड्याने घरे दिली जाणार आहेत. महायुती सरकार, डीआरपी आणि एनएमडीपीएल पुनर्विकास धोरणाच्या नावाखाली करत असलेल्या दमनशाहीपुढे धारावीकर हतबल झालेत. पात्र-अपात्रतेची पहिली यादी जाहीर होतच प्रत्येक झोपडीधारक अधीरतेने आपले नाव शोधत होता. ज्याचे नाव यादीत आले नाही, असे झोपडीधारक डोळ्यात आसवे आणून माघारी परतत होते. यापुढच्या यादीत कुणाचे नाव राहणार, कुणाचे वगळणार या धास्तीत प्रत्येक झोपडीधारक आता दिवस ढकलतोय, धारावीकरांच्या मानगुटीवर बसलेले पात्र-अपात्रतेचे भूत आता उतरण्याची शक्यता दिसत नाही.

# ‘आत्मनिर्भर भारतीय’ होणे अतिशय गरजेचे



आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती असली तरी महाराष्ट्रात मात्र ‘भाषायुद्ध’ सुरू आहे. त्यातच आता राज्य विधिमंडळाचे अधिवेशन आज ३० जूनपासून सुरू होत आहे. त्यामुळे या युद्धाचे ढग आणखी गडद झाले आहेत. ठाकरे बंधू हिंदीविरोधातील आंदोलनात एकत्र येत असल्याने याला एक वेगळीच धार आली होती, ती धार आणि राज्यातील मराठी लोकांचा सरकारविरोधातील रोष पाहून महायुती सरकारचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला हेका सोडलाआहे. त्यांनी हिंदी भाषा लागू करण्याचे दोन्ही जीआर रद्द केले आहेत.

लहान मुलांनी काय शिकावे, यावर राज्यात जोरदार मंथन सुरू आहे. त्याला मंथन म्हणायचे का? हा खरा प्रश्न आहे. त्यावर राजकारण सुरू आहे. असे म्हणणे योग्य ठरेल. महायुती, विशेषतः भाजपा आणि शिवसेना हे दोन्ही पक्ष राज्यातील सर्व शाळांमध्ये ‘त्रिभाषा सूत्र’ लागू करण्यासाठी आग्रही आहेत. लहान मुलांच्या शिक्षणाबद्दलचा त्यांचा हा आग्रह विक्रम आणि वेताळ कथेची आठवण करून देणारा आहे. ‘राजा विक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. झाडावरचे प्रेत खांद्यावर टाकून मौन बाळगत तो स्मशानाच्या दिशेने चालू लागला. प्रेतात बसलेला वेताळ जागा झाला आणि त्याला प्रश्न विचारू लागला...’ सध्या राज्यात हेच तर सुरू आहे. महायुती तिर्सया भाषेचा आग्रह घेऊन पुढे जात आहे आणि विरोधक त्यांच्या भूमिकेबद्दल प्रश्न विचारून त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न करत आहेत. राज्य विधिमंडळाचे आज ३० जूनपासून पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे. त्यात हाच मुद्दा गाजण्याची शक्यता आहे. सरकारच्या तिर्सया भाषेच्या आग्रहाला विरोधक, त्यातही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कडाडून विरोध केला आहे. मराठी माणसाला केंद्रस्थानी ठेवून शिवसेनेचा जन्म झाला होता आणि आता पुन्हा एकदा मराठी माणसाच्या मुद्यावर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येत आहेत. त्यांनी ५ जुलै रोजी एकत्रितपणे मोर्चा काढण्याचे जाहीर केले आहे. त्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षही सहभागी होणार असले तरी सर्व लक्ष हे ठाकरे बंधूंकडे आहे.

राज्यात नवे शैक्षणिक धोरण लागू करताना यंदाच्या शैक्षणिक वर्षात म्हणजे २०२५-२६ पासून त्रिभाषा सूत्र लागू करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. त्यानुसार आधी एप्रिल महिन्यात यासंबंधीचा जीआर काढण्यात आला होता. त्यात मराठी आणि इंग्रजीसह हिंदी भाषाही अनिवार्य करण्यात आली होती. पण त्यावर चौफेर टीका झाली आणि सर्व थरातून विरोध झाल्यावर सरकारने लगेच माघार घेत, हिंदी भाषेपुढील ‘अनिवार्य’ शब्द हटविला. तिसरी भाषा म्हणून कोणत्याही भारतीय भाषेचा पर्याय ठेवण्यात आला. पण त्यासाठी पटसंख्या २० हवी. कमी असेल तर, त्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन शिक्षणाची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. त्यात मेख अशी की, मराठी भाषिक विद्यार्थी कोणती तिसरी भारतीय भाषा निवडतील? तर हिंदीच. कारण आंध्र, तेलंगणचे विद्यार्थी तेलुगू, कर्नाटकचे कन्नड, पश्चिम बंगालचे बंगाली, उत्तर प्रदेश आणि बिहारचे हिंदी भाषा निवडू शकतात. मराठी विद्यार्थ्यांचे काय? याचाच अर्थ मराठी विद्यार्थ्यांसमोर हिंदी भाषेशिवाय पर्यायच नाही. भाजपसह शिंदे गट कितीही सांगत असला की, केवळ मराठी आणि इंग्रजी भाषेची सक्ती आहे, हिंदीची नाही! तरीही ही अप्रत्यक्षपणे सक्तीच करण्यात आली आहे.

याची सुरुवात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या काळातच झाली होती. माशेलकर समितीचा यासंबंधीचा अहवाल महाविकास आघाडीच्या मंत्रिमंडळाने जानेवारी २०२२ मध्ये स्वीकारला होता, असे भाजप आणि शिंदे गटाकडून आता सांगितले जात आहे. असे असले तरी, त्याच्या अंमलबजावणीचा निर्णय महायुती सरकारनेच घेतला आहे ना? ज्याप्रकारे नवे सरकार आल्यानंतर जुन्या सरकारचे निर्णय फिरवले जातात, तसे याबाबतीतही करता आले असते. पण तसे न करता, सामंजस्याने चर्चा न करता, पुढे रेटला जात आहे आणि हाच कळीचा मुद्दा ठरला आहे. महायुतीमधील उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मात्र भाजप आणि शिवसेनेच्या विरोधी भूमिका घेतली आहे. शाळांमध्ये इयत्ता पाचवीपासून हिंदी शिकविण्यात यावी, असे त्यांनी म्हटले आहे. पहिलीमध्ये शिकणाऱ्यांना इंग्रजी आणि मराठी भाषेचे शिक्षण द्यावे आणि पाचवीपासून हिंदी सुरू करावी. जो मराठीमध्ये लिहायला, वाचायला शिकतो त्याला हिंदीसुद्धा लिहिता आणि वाचता येते. कारण दोन्हीची लिपी देवनागरीच आहे, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांची ही भूमिका कदाचित राजकीय धूर्तपणाची असली तरी, तर्कसंगत आहे. पण आता हा मुद्दा आता प्रतिष्ठेचा बनला आहे. तिसऱ्या विषयाचा पर्यायच काढून टाकला तर, ती सरकारची नामुष्की म्हटली जाईल. तसाच आग्रह राहिला तर, विरोध वाढत जाईल आणि विरोधकांना बळ मिळेल, अशी काहीशी स्थिती आहे.

मुळात तिर्सया भाषेचा अट्टाहास का? हेच समजत नाही. भाषेबद्दल एवढाच आग्रह असेल, अगदी सत्ताधारी आणि विरोधकांचाही, तर मंत्री, खासदार, आमदार आणि इतर लोकप्रतिनिधींची भाषा काय? यावर कोण लक्ष देणार? की, ‘लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण’...! ज्या पिढीसाठी आग्रही भूमिका घेतली जात आहे, त्यांच्यासमोर बोलताना तुम्ही काय आदर्श ठेवत आहात? प्रसार माध्यमांशी बोलताना किंवा एखाद्या सभेत भाषण करताना सार्वजनिक जीवनातील जबाबदार व्यक्तीची जीभ घसरतेच कशी? उचलली जीभ आणि लावली टाळ्याला, एवढेच सुरू आहे. डिजिटल क्रांतीमुळे प्रत्येकाच्या हाती स्मार्टफोन दिसतो. हाती स्मार्टफोन येऊनही, तसा स्मार्टपणा प्रत्येकाकडे आहे का? प्रत्येकजण याच फोनमध्ये मान घालून बसलेला दिसतो. सध्या ओटीटी प्लॅटफॉर्मचे पेव फुटले आहे. त्यावरील वेब-सीरिजची भाषा काय? जिथे कोर्टानेही हात टेकले आहेत, त्यावर नियंत्रण आणण्यासाठी सत्ताधारी म्हणून काय प्रयत्न केले गेले किंवा यावर आक्रमक होत विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर किती दबाव आणला? हाही विषय भाषेच्या गौरवाचा आहे... की, ओटीटीवरील भाषेचे ‘लाभार्थी’ हे राजकारणीसुद्धा आहेत!

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तिसऱ्या भाषेवरील वादाचे घोंगडे भिजत ठेवण्यापेक्षा यासंदर्भात दुसऱ्या एखाद्या मार्गाचा विचार का केला जात नाही? आज बेरोजगार आणि रोजगाराची संधी यात प्रचंड तफावत आहे. महापालिकेतील चार-पाच लिपिक पदांसाठी भरतीची जाहिरात प्रसिद्ध होताच, त्यासाठी केले जाणारे अर्ज लाखाच्या पुढेच असते. त्यातही लिपिक पदासाठी अर्ज करणारा बी.ए., एम.ए. असतो, बी.कॉम-एम.कॉम असतो किंवा बी.एस्सी-एम. एस्सी. असतो. एवढेच नव्हे तर, इंजिनिअरदेखील असतो. त्यामुळे यासाठीचे निकष काय आहेत? इतिहास विषय घेऊन बी.ए. झालेली व्यक्ती एखाद्या बँकेत नोकरी करू शकते. मग तुम्ही घेतलेल्या शिक्षणाचे मूल्य काय, यावर कोणी विचार करणार आहे का? त्रिभाषा सूत्राला तामिळनाडूने कडाडून विरोध केला आहे, पण हिंदी भाषेला विरोध त्यांचा आत्ताचा नाही. साधारणपणे १९३०-४० पासून तामिळनाडूची हीच भूमिका राहिली आहे. या राज्याने द्विभाषा सूत्राचा पुरस्कार केला आहे. तामिळनाडूला फक्त मातृभाषा तमिळ आणि दुसरी भाषा इंग्रजी या दोनच भाषा पाहिजेत. मातृभाषेत शिक्षण घेणे विद्यार्थ्यांना सुलभ जाईल आणि इंग्रजी ही भाषा जगाशी संवाद साधणारी आहे, शिवाय विविध संधींचे दरवाजे उघडणारी आहे, असे तामिळनाडूचे आधीपासूनचे म्हणणे आहे.

भाषा ही आत्मसात केली जाते. पिढ्यान्पिढ्या मुंबईत राहणारे अमराठी भाषिक अनेक मराठी माणसांपेक्षा चांगली मराठी बोलतात, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. याउलट, भावी पिढीला शिस्तप्रिय जीवनाचे महत्त्व पटवून देणारे शिक्षण गरजेचे आहे. त्यासाठी लष्करी प्रशिक्षणाचाही विचार केला जाऊ शकतो. ‘आत्मनिर्भर भारत’चा नुसता उदो उदो करून उपयोग नाही. ‘आत्मनिर्भर भारतीय’ होणेही तेवढेच गरजेचे आहे. शिक्षणानुरूप रोजगार मिळण्याची शाश्वती मिळाली पाहिजे. संरक्षण क्षेत्रात ‘आत्मनिर्भर भारत’ तयार करण्याचे द्रष्टेपण माजी संरक्षणमंत्री मनोहर पर्रिकर यांनी दाखवले. तसे द्रष्टेपण सर्वच क्षेत्रात, पण प्रामुख्याने शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रांमध्ये गरजेचे आहे. भाषेबद्दल वादाची राळ उडवून हाती काही लागणार नाही. महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सर्वसामान्यांच्या डोळ्यात धुळफेक करणे, एवढेच कारण तूर्तास तरी दिसत आहे.

# धोंडीराम मानसिकतेमुळे मुलांसोबत पालकांचाही विनाश!



काही दिवसांपूर्वी सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यात नीटच्या सराव परीक्षेत कमी गुण मिळाल्याने मुख्याध्यापक असलेल्या धोंडीराम भोसले नामक पित्याने रागाच्या भरात मुलगी साधना हिला बेदम मारहाण केली. त्यात तिचा मृत्यू झाला. या घटनेनं फक्त सांगलीकरचं नाही तर सगळा समाज सुन्न झाला. ही घटना प्रत्येक पालक व पाल्य त्यांच्यातील नातेसंबंध, एकमेकांकडून असलेल्या अपेक्षा यांचा संघर्ष दाखवणारी होती. या धोंडीराम मानसिकतेतून मुलांसोबत पालकांचाही विनाश होतो, हे सगळ्यांनी लक्षात घ्यायला हवे.

आज थोड्याफार फरकाने का होईना पण बऱ्याच घरांमध्ये भोसले कुटुंबातला मुलांवर अपेक्षांचं ओझं लादणारा धोंडीराम नावाचा पालक आणि त्याला उलट उत्तर देणारी झेन जी पिढीतली साधना नावाची संतती आहे. त्यामुळे आताच्या काळात जेव्हा अशा घटना घडतात तेव्हा त्या जिव्हारी लागतात. कारण समाजात असेही काही पालक आहेत जे त्यांना जमलं नाही ते मुलांकडून करून घेण्यासाठी आग्रही असतात. त्यातही जर पालक अशिक्षित असेल तर मुलाने उच्च शिक्षण घ्यावं असा त्याचा आग्रह असतो. पालकाचं डॉक्टर व्हायचं स्वप्न असेल जे पूर्ण झालं नसेल तर अशावेळी मुलाकडून त्या अपेक्षा पालक करतात. यातील काही अपेक्षा रास्तही असू शकतात. पण धोंडीरामसारख्या घटनांमध्ये त्या एखाद्याच्या जीवावर बेतू शकतात. कारण धोंडीराम यांनीही तेच केलं. मुलीची आकलनशक्ती किती आहे हे न पाहता किंवा माहीत असूही त्याकडे दुर्लक्ष करत फक्त आपली अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी मुलगी साधनावर सतत दबाव आणला.

तिला अभ्यासावरून सतत टोमणे मारणे, घालून पाडून बोलत तिचं ते मानसिक खच्चीकरण करत राहीले. परिणामी साधना कोडगी झाली आणि शेवटी अ रे ला का रे करण्याची हिंमत तिच्यात आली. त्यातूनच पप्पा, तुम्ही कुठे कलेक्टर झालात, तुम्हालाही कमीच मार्क पडले होते ना? असं उलट उत्तर तिने दिलं. ज्यामुळे धोंडीरामचा पुरुषी अहंकार जागा झाला. आणि आपल्या बौद्धिक योग्यतेवर प्रश्नचिन्ह उगारर्णाया साधनाला त्यांनी जात्याच्या खुंट्याने बेदम मारहाण केली. त्यात तिचा मृत्यू झाला. आपल्या मुलीच्या मृत्यूमुळे धोंडीरामला तुरुंगात जावे लागले. मुले आपल्या पालकांना अशी सहजासहजी उलटून बोलत नाहीत, पण जेव्हा मुलांवर पालकांकडून अपेक्षांचा अतिरेक केला जातो, त्या अपेक्षा त्यांच्या कुवतीच्या पलीकडच्या असतात, तेव्हा त्यातून आपली सुटका करून घेण्यासाठी मुले पालकांच्या कमतरता दाखवण्याचा प्रयत्न करतात.

ही घटना म्हणजे त्या समस्त पालकांसाठी धडा आहे जे स्वतःची अपूर्ण स्वप्न मुलांच्या मार्फत पूर्ण करू पाहतात. ही आजची वस्तूस्थिती आहे. यास हल्लीची स्पर्धात्मक परिस्थितीही जरी जबाबदार असली तरी कित्येक पालकांसाठी आणि मुलांसाठीही आयुष्यात एका उंचीवर पोहचणं हा स्टेटसचा प्रश्न झालाय. कारण पालकांच्या दृष्टीने मूल आयुष्यात जितकं यशस्वी होईल, पालकांचे समाजातले स्टेटसही तितकेच वाढते. चार लोकात अभिमानाने कमी आणि अहंकाराने आपलं पोर डॉक्टर असल्याचं, इंजिनियर झाल्याचं, परदेशात शिकत असल्याचं आपल्या आजूबाजूला अनेक पालक छाती फुगवून सांगताना दिसतात. सोशल मीडियावर सांगताना दिसतात ते याच भावनेतून. मग यातूनच धोंडीबा भोसलेसारख्या पालकाचा अहंकार पेटून उठतो आणि आपल्या मुलीनेही असेच यश मिळवावे यासाठी तो अतिरेकी अट्टाहास करतो.

काहीवेळा तर पालकांकडूनच नकळत एकाच कुटुंबात राहणाऱ्या मुलांमध्ये अशा मुलांच्या हुशारीच्या, श्रीमंतीच्या जणू स्पर्धाच लावल्या जातात. आमचा मुलगा-मुलगी फारच हुशार आहे, यशस्वी आहे वगैरे बाता मारण्यात अनेक पालक इतरांना सांगताना तासनतास वाया घालवतात. पण पालकांच्या अपेक्षांच हे ओझं वाहताना पोरांची काय दमछाक होते याचा विचार मात्र पालक करत नाहीत. त्यातून मग साधनासारखी मूलं पेटून उठतात आणि पालकांच्याच हुशारीवर प्रश्नचिन्ह उगारतात, लायकी काढतात आणि मुलाने उलट उत्तर दिलं, आपल्याच बुद्धीमतेला आव्हान दिलं असा विचार करून अपमान आणि राग यातून मुलांचा आवाजच बंद केला जातो. ही दुर्दैवी नाही तर भयानक बाब आहे. त्यामुळे सुजाण व सुज्ञान पालकांनी आजच्या स्पर्धात्मक युगात अशा घटना टाळायच्या असतील तर पालक म्हणून डोळसपणे आपल्या आजूबाजूला पाहायला हवे.

आपल्या मुलांची बुद्धिमता, त्याची बाहेरच्या जगातली आव्हान झेलण्याची, पेलण्याची, त्यांना सामोरं जाण्याची कुवत किती आहे हे फक्त आई-बापालाच माहीत असते. सगळ्याच क्षेत्रात स्पर्धा वाढत चालल्या आहेत. त्यामुळे सगळीच पोरं जीव तोडून अभ्यास करत असतात. काही यास अपवादही असू शकतात. शेवटी प्रश्न असतो तो ज्याच्या त्याच्या आकलनशक्ती व बुद्ध्यांकाचा. जो या जगात कोणतेही मायबाप बाहेरून विकत आणून पोरांच्या मेंदूत फिट करू शकत नाहीत. त्यासाठी फार तर महागड्या शाळा कॉलेजला पैसै देऊन मुलांना पंचतारांकित शैक्षणिक संस्थेत घुसवू शकतात, पण त्यानंतरची बौद्धिक लढाई ही त्या मुलांना स्वतःलाच लढायची असते. स्वतःला सिद्ध करायचं असतं. तिथे पालकांचा रोल संपलेला असतो. यामुळे पालकांनी रोप पाहून पाणी द्यावे याप्रमाणे आपल्या मुलांच्या बौद्धिक कुवतीप्रमाणे त्यांना घडवावं त्यासाठी सर्वतोपरी मदत करावी. त्यामुळे उगाचचं टक्केवारीच्या बाजारात मुलांचा बळी जाणार नाही याची काळजी पालकांनीच घ्यायला हवी. फक्त दहावी-बारावी, नीट, जेईई, सीएटी यासारख्या परीक्षांत उत्तम गुणांनी पास होणं म्हणजे यशस्वी होणं नाही, जोपर्यंत हे पालकांनाच कळत नाही तोपर्यंत मुलांनाही ते समजणार नाही.

आई बापाची स्वप्न पूर्ण करण्यासाठी पर्सेंटेजचं ओझं मनावर आणि शरीरावर वाहून नेणारी ही मुलं जेव्हा परदेशात शिक्षण किंवा नोकरीसाठी जातात तेव्हा त्यांना तिथे कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागतो हे ज्यावेळी पालक उघड डोळ्यांनी बघतील तेव्हाच त्यांना मुलांच्या वेदना समजतील. जर हीच वस्तूस्थिती तपासून पाहायची असेल तर गेल्या काही वर्षात अभ्यासाच्या ओज्याने आणि बेकारीने सर्वाधिक आत्महत्या करणाऱ्यांमध्ये अग्रक्रमावर असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांची आकडेवारी पाहावी. ती पाहिल्यानंतर पालक मुलांवर आपल्या अपेक्षांचं ओझं लादणार नाहीत.

पालकांकडून आपल्या अपेक्षांचे ओझे मुलांवर लादण्याचे प्रकार हे केवळ डॉक्टर किंवा इंजिनिअरींगपासून सुरू होत नाही, तर यांची सुरुवात अगदी पहिलीपासून होते. अगदी लहानपणापासून मुलांच्या मनावर गळेकापू स्पर्धेचे संस्कार पालकांकडून केले जातात. खरे तर मुलांनी शाळेतील शिक्षण हे खेळीमेळीच्या वातावरणात घेणे अपेक्षित असते. त्यात पुन्हा अलीकडच्या काही वर्षांमध्ये शाळकरी मुलांनी केवळ घोकंपट्टी न करता यांना प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून कृतिशील करण्यावर भर देण्यात येतो. त्यामुळे मुलांना मोठ्या प्रमाणात विविध प्रकारचे प्रोजेक्ट घरून पूर्ण करून आणायला सांगितले जातात. ते प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी बरेचदा पालक मंडळीच रात्री उशिरापर्यंत राबताना दिसतात. कारण ते मुलांनी घरून पूर्ण करून आणण्याचा दबाव शाळांकडून असतो. त्यामुळे कुणाचा प्रोजेक्ट अधिक चांगला यासाठी स्पर्धा सुरू होते. त्यामुळे मुलांसोबत पालक त्या स्पर्धेत ओढले जातात. त्याचा ताण मुलांसोबत पालकांच्या मनावर येत असतो. खरे तर शिक्षण हे मनमोकळ्या वातावरणात घेणे अपेक्षित असते. पण तसे होताना दिसत नाही.

आता सगळ्याच गोष्टीचा ॲडव्हासमध्ये म्हणजे आगाऊ विचार करण्यावर भर दिला जातो. मुलाने पुढे काय व्हावे, हे पालक त्याच्या अगदी कोवळ्या वयात ठरवून त्याच्यावर आपल्या मनातील इच्छा लादण्याचा प्रयत्न करतात, हे म्हणजे बालविवाह लावून देण्यासारखे आहे. म्हणजे ज्या वयात आपल्याला काय हवे काय नको, काय योग्य काय अयोग्य हे कळत नाही, त्या वयात आपल्या मनाविरुद्ध दुसऱ्याने आपल्याविषयी निर्णय घेऊन मोकळे होण्यासारखे आहे. मुलांना मोठे होऊ त्यांना काय योग्य वाटते, काय जमते त्यानुसार त्यांना करू द्या. आम्ही मुलांच्या भल्यासाठी सगळे करत असतो, असे पालकांचे म्हणणे असते, पण मुलांचे भले करताना आपल्या अपेक्षांचा भाला, मुलांच्या डोक्यात खुपसत नाही ना, तेही लक्षात ठेवण्याची गरज आहे. कारण जगामध्ये जी मुले स्वतंत्र आणि मोकळ्या वातावरणात त्यांच्या मानसिक कलाप्रमाणे शिकली आहेत, त्यांनीच जगात भव्यदिव्य कामगिरी करून दाखविलेली आहे, हेच इतिहास सांगतो.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख नसल्याने शांघाय सहकार्य परिषदेत (एससीओ) सहभागी देशांच्या संरक्षणमंत्र्यांच्या बैठकीतील संयुक्त निवेदनावर स्वाक्षरी न करण्याची भारताची कृती आजवरच्या भूमिकेशी सुसंगत अशीच आहे. प्रादेशिक शांततेला दहशतवादामुळे निर्माण झालेल्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठीच्या या संयुक्त निवेदनात पाकिस्तानमधील जाफर एक्स्प्रेसवरील हल्ल्याचा उल्लेख असणे आणि पाकिस्तानने घडवून आणलेल्या पहलगाम हल्ल्याचा समावेश नसणे यातून ‘एससीओ’चा दुटप्पीपणा दिसतो. भारताची कोंडी करण्याचे यजमान चीन आणि पाकिस्तान यांचे राजकारण यामागे आहे. हे राजकारण आणि ‘एससीओ’च्या बैठकीची दहशतवादाबाबतची सोयीस्कर भूमिका निषेधार्ह आहे. दहशतवादाकडे सोयीने आणि हितसंबंधांच्या दृष्टिकोनातून पाहण्यामुळेच त्याचे आव्हान वाढले आहे. चीनच्या छिंगदाव येथे झालेली ही बैठक या आव्हानाला सामोरे जाण्यात अपयशी ठरली आहे. इस्त्रायल-इराण युद्धाच्या आणि त्याच्या आधी भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या या बैठकीत प्रादेशिक सहकार्याबरोबरच शांततेचा आणि दहशतवादाचा मुद्दा येणे स्वाभाविक होते. गेल्या तीन दशकांपासून पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचा सामना करीत असलेला भारत सर्व आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर हा मुद्दा जोरकसपणे मांडत आहे.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करून संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी पाकिस्तानच्या कारवायांचा पाढा या बैठकीत वाचला. दहशतवादाचा शस्त्रास्त्रासारखा वापर करण्याची प्रवृत्ती असणारे देश असतील, तर शांतता कशी प्रस्थापित होईल, असा सवाल त्यांनी केला. अशा अविश्वासाच्या वातावरण शांतता नांदण्यासाठी दहशतवादाचा बीमोड करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. त्यांनी अशा प्रकारे पृष्ठभूमी करूनही संयुक्त निवेदनात पहलगाम हल्ल्याचा उल्लेख केला गेला नाही. याच्या उलट बलुचिस्तानातील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख केला गेला. अशा निवेदनावर स्वाक्षरी न करण्याचा पवित्रा घेऊन संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी योग्यच केले. भारताच्या नकारामुळे सर्वसहमतीने निवेदन प्रसिद्ध करण्यात ही बैठक अयशस्वी ठरली हे खरे; परंतु दहा देशांचा समावेश असलेल्या या परिषदेत भारताच्या बाजूने एकही देश उभा राहिला नाही, ही चिंतेची बाब म्हणावी लागेल. चीन आणि पाकिस्तान यांच्याखेरीज कझाकस्तान, किरगिझिस्तान, उझबेकिस्तान, ताजिकिस्तान हे मध्य आशियाई देश, तसेच रशिया, बेलारूस आणि

## ‘एससीओ’चा दुटप्पीपणा



इराण हे ‘एससीओ’चे सदस्य देश आहेत. रशिया हा भारताचा जुना मित्र खरा; परंतु त्यानेही या बैठकीत भारताची बाजू घेतली नाही. रशिया-युक्रेन युद्ध , इस्त्रायल-हमास आणि इस्त्रायल-इराण संघर्ष या पार्श्वभूमीवर नवीन आंतरराष्ट्रीय समीकरणे सध्या साकारली जात आहेत. त्याचा हा परिणाम असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्षातही बदलत्या समीकरणाचा परिणाम दिसला होता. अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यातील नजीकताही सध्या वाढत असल्याचे चित्र आहे. दहशतवादाच्या मुद्द्यावर पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर एकाकी पाडण्यात भारत यापूर्वी अनेकदा यशस्वी ठरला आहे. याच ‘एससीओ’च्या व्यासपीठावरून भारताने यापूर्वीही दहशतवाद्यांच्या विरोधात आवाज उठविला आहे आणि पाकिस्तानचा विरोध असतानाही त्याबाबतचे मुद्दे संयुक्त निवेदनात आणू शकला आहे. मात्र, आताच्या ‘एससीओ’त भारत दहशतवादाच्या मुद्द्यावर एकाकी पडल्याचे दिसते. ‘एससीओ’त भारताला एकाकी पाडण्यात यशस्वी झाल्याचा दावाही पाकिस्तानकडून केला जात आहे. ‘एससीओ’ ही आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठा प्रभाव पाडणारी संघटना नाही; परंतु प्रामुख्याने मध्य आशियातील देशांमधील हितसंबंध दृढ करण्याबरोबरच आपले सामरिक आणि व्यापारी उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी चीन या संघटनेचा उपयोग करीत आला आहे. भारत आणि पाकिस्तान तसे उशिराने या संघटनेत सहभागी झाले. ‘एससीओ’वर चीनचा प्रभाव असला, तरी मध्य आशियाई देशांशी संबंध दृढ करण्यासाठी, तसेच दहशतवादासह अनेक मुद्द्यांवरील भूमिका मांडण्यासाठी भारताला हे व्यासपीठ उपयुक्त ठरू शकते. पाकिस्तान हा दहशतवादाचा केंद्रबिंदू असल्याचे भारत सातत्याने मांडत आहे. अमेरिकेसह अनेक देशांना ते मान्य असले, तरी भू-राजकीय गणिते मांडून ते सोयीने पाकिस्तानची पाठराखण करीत असतात. याचा अर्थ असा, की दहशतवादाच्या विरोधातील लढाई भारताला स्वतःच लढायची आहे. दहशतवादाच्या विरोधात आवाज उठवितानाच आपली बाजू अधिक भक्कमपणे मांडण्याची व्यूहरचना करण्याचे आव्हान भारतासमोर आहे.

# हिंदी सक्तीविरोधात एकजूट
## ठाण्यात शिवसेना, मनसेचा संयुक्त एल्गार

**राज्याच्या शैक्षणिक आणि भाषिक स्वायत्ततेवर गदा आणणाऱ्या केंद्र सरकारच्या हिंदी सक्तीच्या धोरणाविरोधात ठाण्यात एक आगळेवेगळे चित्र पाहायला मिळाले. विविध राजकीय मतभेद बाजूला ठेवत, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षांनी एकत्र येत हिंदी सक्तीविरोधात रविवारी आवाज उठवला. ठाण्यात, शहापूर, दिवा, उल्हासनगरमध्ये शासननिर्णयाची प्रतीकात्मक होळी करत मराठी अस्मितेच्या रक्षणासाठी संयुक्त एल्गार करण्यात आला. या आंदोलनामुळे भाषेच्या मुद्द्यावर राजकीय पक्षांची नव्याने जुळत चाललेली वीण राज्याच्या भविष्यातील राजकारणावर दूरगामी परिणाम घडवू शकते.**



**■ठाणे :** केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत राज्यातील शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून हिंदी शिकवण्याची सक्ती करण्याचा प्रस्ताव पुढे आल्यानंतर महाराष्ट्रात संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. मराठी भाषेला दुय्यम स्थान देण्याच्या या प्रयत्नाच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) पक्षांनी ठाणे शहरात एकत्र येत जोरदार आंदोलन केले. रविवारी दुपारी जांभळी नाका चौकात हे आंदोलन पार पडले. या आंदोलनाचे केंद्रबिंदू ठरले 'शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी', ज्याच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या हिंदी सक्तीविरोधातील नाराजी व्यक्त करण्यात आली. यावेळी परिसरात 'हिंदीची सक्ती बंद करा', 'मराठीचा अपमान खपवून घेतला जाणार नाही', 'मराठीला राष्ट्रभाषेचा दर्जा द्या', अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. आंदोलनात सहभागी कार्यकर्त्यांनी हातात फलक, झेंडे घेत शासनाच्या निर्णयाविरोधात संतप्त रोष व्यक्त केला. महाराष्ट्रात शिक्षण मराठीतूनच असावे, हे आमचे ठाम मत आहे. इतर भाषा शिकण्यास आम्ही विरोध करत नाही, पण ती सक्ती असू नये. मराठी माणसालाच आपल्या राज्यात परका बनवण्याचा हा प्रयत्न आम्ही यशस्वी होऊ देणार नसल्याचे मनसेचे ठाणे शहर अध्यक्ष रवींद्र मोरे यांनी म्हटले आहे. नेत्यांनी यावेळी स्पष्ट केले की, हा वाद केवळ भाषेचा नाही, तर महाराष्ट्रीय जनतेच्या अस्मितेशी निगडित आहे. केंद्र सरकारने जर या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला, तर याला व्यापक जनआंदोलनाच्या रूपात विरोध करण्यात येईल, असा इशारा दिला. आंदोलनामुळे जांभळी नाका परिसरात काही काळ वाहतूककोंडी झाली होती. मात्र पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवल्याने आंदोलन शांततेत पार पडले. या आंदोलनात विविध पक्षांचे महत्त्वाचे नेते सहभागी झाले होते.

"मराठीवर होणाऱ्या आक्रमणाविरोधात सर्व पक्षातील नेते, पदाधिकारी, नागरिक एकत्र आले. रविवारी देखील जांभळी नाका येथे जीआरची होळी करण्यात आली, ही ५ जुलैच्या मोर्चाची एक झलक होती. मराठीची गळचेपी करण्याचा भाजप व शिंदेंच्या शिवसेनाचा कुटील डाव मराठी माणूस एकवटून उधळणार आहे. डॉक्टर, वकील, अभिनय अशा विविध क्षेत्रातील मराठीप्रेमी मोर्चात येण्यासाठी तयार आहेत."

**-संदीप पाचंगे, सरचिटणीस मनविसे**

"ही फक्त भाषेची लढाई नाही, तर महाराष्ट्राच्या अस्मितेची लढाई आहे. मराठी ही राज्याची मातृभाषा असून तिच्या अस्मितेवर घाला घालणाऱ्या कोणत्याही धोरणांचा आम्ही रस्त्यावर उतरून विरोध करू."

**-राजन विचारे, माजी खासदार**

### शिवसेना उबाठा गटातर्फे निदर्शने

**भिवंडी :** राज्यात तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती केली जात असून त्याविरोधात राज्यात जनक्षोभ उसळता आहे. या निर्णयास विरोध करण्यासाठी भिवंडीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख मनोज गगे व शहर प्रमुख प्रसाद पाटील यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी अध्यादेशाच्या प्रतींची होळी करीत उग्र निदर्शने केली. तिसरी भाषा म्हणून हिंदी महाराष्ट्रावर लादण्यापेक्षा उत्तर भारतात भाजपने तिसरी भाषा सक्तीची करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांच्या वतीने जिल्हाप्रमुख मनोज गगे यांनी केली आहे. रविवारी दुपारी झालेल्या या आंदोलनात माजी शहरप्रमुख मोहन बल्लाळ, महिला संघटक वैशाली मेस्त्री, जिल्हा सचिव राजा पुण्यार्थी, तालुका युवासेना अधिकारी पंकज घरत, यांसह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मीरा-भाईंदरमध्ये शिवसेना-मनसेचे आंदोलन

**भाईंदर :** राज्य शासनाने शाळेत पहिलीपासून हिंदी सक्ती केली आहे. त्याविरोधात मीरा-भाईंदरमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने व महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्याकडून भाईंदर पूर्वेच्या गोल्डन नेस्ट चौकात शासनाने काढलेल्या आदेशाचे जीआर जाळत रविवारी आंदोलन केले. गेल्या काही दिवसापासून पहिलीपासून हिंदी विषय शिकवण्याची सक्ती शासनाने केली असल्याचा विरोधाकडून ओरड केली जात आहे, तर शासनाकडून हिंदी सक्ती केली नसल्याचे सांगितले जात आहे. हिंदी सक्तीविरोधात शिवसेना, मनसे व इतर पक्ष यांनी एकजूट करत ५ जुलै रोजी मुंबईत आंदोलन पुकारले आहे. रविवारी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांनी राज्यभर शासनाने हिंदी सक्तीचे काढलेल्या जीआर जाळून आंदोलन करण्यात आले आहे. मीरा-भाईंदरमध्ये देखील शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने एकत्र येत आंदोलन केले आहे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रभाकर म्हात्रे, महिला जिल्हा संघटक नीलम ढवण, मीरा-भाईंदर विधानसभा समन्वयक मनोज मयेकर, १४५ विधानसभा समन्वयक धनेश पाटील, उपजिल्हाप्रमुख सुभाष केसरकर, ग्राहक संरक्षणचे सदानंद घोसाळकसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### दिव्यातही ठाकरे गट आक्रमक

**दिवा :** दिवा शहरातील प्रभाग क्रमांक २८ मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने राज्य सरकारने लादलेल्या हिंदी सक्तीविरोधात तीव्र निषेध नोंदवत सरकारच्या हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करण्यात आली. या आंदोलनाद्वारे केंद्र सरकारचा विरोध करताना मराठी भाषेवरील अन्यायाविरोधात संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. ₹मराठी माणसाचा, मराठी भाषेचा अपमान सहन केला जाणार नाही₹, अशा निर्धारपूर्ण घोषणा देत स्थानिक कार्यकर्त्यांनी सरकारच्या निर्णयाचा निषेध केला. या आंदोलनात शिवसेनेचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे, विधानसभा संघटिका योगिता नाईक, दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील, उपशहर प्रमुख मारुती पडलकर, उपशहर संघटक शनिदास पाटील, विभाग प्रमुख संजय जाधव, योगेश निकम, हेमंत नाईक, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### उल्हासनगरात हिंदी सक्तीवरून संतापाचा उद्रेक

**उल्हासनगर :** महाराष्ट्र सरकारने नुकताच शाळांमध्ये हिंदी भाषा सक्तीने शिकविण्याचा शासन निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयाने संपूर्ण राज्यात मराठीप्रेमी नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर उल्हासनगर शहरात रविवारी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी एकत्र येत तीव्र आंदोलन केले. कॅम्प ४ येथील मध्यवर्ती शिवसेना शाखेसमोर शासन परिपत्रकाची जाहीर होळी करत सरकारविरोधात जोरदार घोषणा देण्यात आल्या. या आंदोलनाचे नेतृत्व शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख धनंजय बोडारे आणि मनसेचे स्थानिक पदाधिकारी यांनी केले.



"हिंदी भाषा शिकण्याची सक्ती करून मराठीवर अन्याय होतोय, हे आम्हाला मान्य नाही. या आंदोलनामुळे उल्हासनगरात एकजुटीनं उठलेला हा मराठी आवाज सर्वत्र पोहोचत असून, आगामी काळात अशा आंदोलनांची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. शिवसेना व मनसेचा हा एकत्रित विरोध हे संकेत देतोय, की मराठी भाषेसंदर्भातील कुठलाही अन्याय आता निमूटपणे सहन केला जाणार नाही."

**-बंडू देशमुख, जिल्हाध्यक्ष मनसे**

### नवी मुंबईत राज्य सरकारविरोधात संताप



**नवी मुंबई :** कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांवर हिंदीची सक्ती लादू देणार नाही, असे ठणकावून सांगत रविवारी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नवी मुंबई जिल्हा शाखेच्यावतीने आंदोलन छेडण्यात आले. संतप्त शिवसैनिकांनी वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करून राज्य सरकारच्या विरोधात सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसेना नेते माजी खासदार राजन विचारे, उपनेते विठ्ठल मोरे आणि नवी मुंबई जिल्हा संपर्कप्रमुख एम. के. मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनात जिल्हाप्रमुख प्रकाश पाटील, प्रवीण म्हात्रे, प्रवक्ते अनिश गाढवे, काँग्रेसचे अरविंद नाईक, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गणेश शिंदे, उपजिल्हाप्रमुख अतुल कुळकर्णी, सुमित्र कडू आदी सहभागी झाले होते.

### शहापुरात शासकीय जीआरची होळी

**शहापूर :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रद्रोही सरकारच्या वतीने मराठी भाषेवर होणाऱ्या आक्रमणाविरोधात हिंदी सक्तीचा जो शासकीय जीआर भाजप महायुती सरकारने काढलाय त्या शासकीय जीआरची होळी शहापूर तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने खर्डी शाखेसमोर करण्यात आली. यावेळी उपनेत्या ज्योती ठाकरे, जिल्हाप्रमुख कुंदन पाटील, महिला आघाडी जिल्हा संघटिका रश्मी निमसे, तालुका प्रमुख कुलदीप धानके, सचिव रवींद्र लकडे, जिल्हा सहसचिव डॉ. अजित पोतदार, मराठी भाषाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नवी मुंबईतून विमानोड्डाणाचा १७ सप्टेंबरचा मुहूर्त
### पंतप्रधानांच्या वाढदिवशीच विमानोड्डाणाला सुरुवात होणार?



**■नवी मुंबई :** नवी मुंबईतून विमानोड्डाणाचा मुहूर्त येत्या सप्टेंबर महिन्यातला काढला जाणार असल्याचे विमानतळ उभारणाऱ्या अदानी समूहाकडून राज्याच्या सार्वजनिक उपक्रम समितीला सांगण्यात आले. त्यामुळे येत्या १७ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नवी मुंबईतून विमानोड्डाणाला सुरुवात करण्याचा मानस राज्य सरकार व अदानी समूहाचा दिसून येत असल्याचे बोलले जात आहे. नवी मुंबई राज्यातील विमानतळ प्रकल्पाच्या कामाच्या सार्वजनिक आढावा बैठकीसाठी बुधवारी विमानतळ साईटवर आलेल्या राज्यातील आमदारांच्या सार्वजनिक उपक्रम समितीच्या (पीयूसी) शिष्टमंडळासमोर प्रकल्पाचे सादरीकरण करताना नवी मुंबईतून विमानोड्डाणाचा मुहूर्त आता येत्या सप्टेंबर महिन्यातला ठरवला जाणार आहे.

"नवी मुंबई विमानतळ प्रकल्प हा नवी मुंबई आणि संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशासाठी वाहतूक आणि व्यापाराच्या दृष्टीने महत्वपूर्ण केंद्र ठरणार आहे. सदर विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय दर्जाची कनेक्टिव्हिटी आणि व्यापार वाढीच्या नव्या संधी महाराष्ट्रासाठी व या देशासाठी निर्माण होणार आहे."

**-- विजय सिंघल, व्यवस्थापकीय संचालक सिडको**

**आता प्रतीक्षा सप्टेंबरची**

यापूर्वी मे व जून २०२५ मध्ये नवी मुंबईतून विमानोड्डाण करण्याचा मुहूर्त काढण्यात आला होता. परंतु, विमानतळ टर्मिनलचे काम पूर्ण न झाल्याने १५ ऑगस्टचा मुहूर्त काढण्यात आला होता. मात्र टर्मिनलचे काम पुर्णत्वास जाण्यासाठी किमान १५ सप्टेंबर उजाडणार असल्याचे अदानी समूहातर्फे सार्वजनिक उपक्रम समितीच्या आढावा बैठकीत सांगण्यात आले. १७ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस असल्याने विमानतळ उद्घाटनाचा मुहर्त या तारखेच्या आसपास होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## लोटस तलावासाठी पर्यावरणप्रेमींचे आंदोलन... न्यायालयातही लढण्याचा निर्धार

**■नवी मुंबई :** नवी मुंबईतील सीवूड्स सेक्टर २७ मधील लोटस तलाव वाचवण्यासाठी पर्यावरणप्रेमींनी सलग चौथ्या रविवारी तीव्र आंदोलन करत सिडकोविरोधात लढा अधिक तीव्र करण्यात आला. सिडकोकडून तलावात १०० ट्रक माती भरून भराव टाकण्यात आल्याचा आरोप करत तलाव नष्ट करण्याच्या प्रयत्नांचा पर्यावरणप्रेमींनी तीव्र निषेध केला.



रविवारी लोटस तलाव परिसरात नागरिक, सामाजिक संस्था, वकील, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने एकत्र आले. त्यांनी 'पर्यावरण टिकवा, लोटस लेक वाचवा' अशा घोषणा देत तलावाभोवती वॉकेथॉन केले आणि सिडकोच्या मनमानी कारभाराविरोधात संताप व्यक्त केला.

पर्यावरणप्रेमी आणि सेव्ह लोटस लेक आंदोलनाचे अग्रणी सुनील अग्रवाल यांनी आंदोलनकर्त्यांना संबोधित करत सांगितले की, 'सिडकोच्या विरोधात आम्ही आता रस्त्यावरची लढाईसोबतच न्यायालयातही सक्षमतेने लढणार आहोत. लोटस तलाव बिल्डरांच्या घशात जाऊ देणार नाही. ते म्हणाले की, नवी मुंबईच्या निसर्गसंपत्तीचा विध्वंस करणाऱ्या सिडकोला आता या शहरातून हद्दपार करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे नागरिकांनी यापुढेही एकत्र राहून या लढ्याला बळ देण्याची गरज आहे.

तसेच या पार्श्वभूमीवर विष्णुदास भावे नाट्यगृह येथे झालेल्या वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनतेच्या दरबारातही पर्यावरणप्रेमींनी लोटस तलाव वाचवण्याची मागणी केली. मंत्री नाईक यांना लेखी निवेदनही देण्यात आले.

## चालू बिलासह थकबाकी भरण्याचे महावितरणचे आवाहन

**■कल्याण :** महावितरणच्या परिमंडलात एप्रिल आणि मे या दोन महिन्यात लघुदाब वीज ग्राहकांकडील (कृषिपंप व कायमस्वरुपी वीज खंडित ग्राहक वगळून) वीजबिल थकबाकीत तब्बल २१० कोटी रुपयांची भर पडली आहे. याव्यतिरिक्त मार्च २०२५ अखेरची २५ कोटी २३ लाख रुपयांची थकबाकी तसेच जून महिन्यातील १०८ कोटी ७६ लाख रुपयांची चालू थकबाकी वसुलीचे मोठे आव्हान कर्मचाऱ्यांसमोर आहे. परिणामी थकित वीजबिलाची वसुली अथवा थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याशिवाय पर्याय नाही. वीज खंडितची कटू कारवाई टाळण्यासाठी थकीत व चालू वीजबिल तसेच सुरक्षा ठेवीचा त्वरित भरणा करावा, असे आवाहन कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी केले आहे.

मागील थकबाकी आणि जून महिन्यातील चालू थकीत वीजबिल लक्षात घेता कल्याण परिमंडलातील लघुदाब ग्राहकांकडून ३० जूनपर्यंत ३४४ कोटी रुपये वसूल होणे आवश्यक आहे. यात कल्याण पूर्व आणि पाश्चिम तसेच डोंबिवली विभागाचा समावेश असलेल्या कल्याण मंडल कार्यालय एक अंतर्गत ६० कोटी २६ लाख रुपयांचा समावेश आहे. उल्हासनगर एक आणि दोन, कल्याण ग्रामीण व बदलापूर विभागाचा समावेश असलेल्या कल्याण मंडल दोन अंतर्गत १०६ कोटी ३५ लाख रुपयांच्या वीजबिलाचा समावेश आहे. वसई व विरार विभागाचा समावेश असलेल्या वसई मंडलातील ग्राहकांकडील १२३ कोटी ४३ लाख तर पालघर मंडलातील ग्राहकांकडील ५३ कोटी ९३ लाख रुपयांचा समावेश आहे. त्यामुळे कल्याण परिमंडलात थकीत वीजबिलापोटी वीजपुरवठा खंडित करण्याची मोहिम तीव्र करण्यात आली आहे.

जून अखेरपर्यंत रविवार आणि इतर सुट्टीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्र सुरु ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय महावितरणचे www.mahadiscom.in हे संकेतस्थळ, ग्राहकांसाठीचे मोबाईल अॅप, विविध पेमेंट वॅलेट आदींच्या माध्यमातून डेबिट/क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग मार्फत वीजबिल ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. या सुविधांचा उपयोग करून थकबाकी, चालू वीजबिल तसेच सुरक्षा ठेवीचा विहित मुदतीत भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी कल्याण परिमंडलातील वीज ग्राहकांना केले आहे.

## ईडीची पीडा टळल्याने हसन मुश्रीफांना दिलासा... किरीट सोमय्यांना मोठा धक्का!

**■मुंबई :** संताजी घोरपडे साखर कारखाना प्रकरणात हसन मुश्रीफांना दिलासा तर किरीट सोमय्यांना मोठा धक्का बसलाय. संताजी घोरपडे कारखान्यातील कथित घोटाळा प्रकरणात उच्च न्यायालयाकडून मुश्रीफांना दिलासा मिळालाय.या प्रकरणात दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करण्याची याचिका उच्च न्यायालयान निकाली काढलीय.

किरीट सोमय्यांनी भ्रष्टाचाराचे आरोप केलेल्या नेत्यांना क्लिन चीट मिळण्याची मालिका सुरूच आहे. राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री हसन मुश्रीफांना उच्च न्यायालयानं मोठा दिलासा दिलाय. संताजी घोरपडे साखर कारखाना प्रकरणात दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करण्याची याचिका उच्च न्यायालयान निकाली काढलीय. त्यामुळे पुन्हा एकदा भाजप नेते किरीट सोमय्या यांना मोठा धक्का बसलाय.

**मुश्रीफांची ईडीची पीडा टळली**

संताजी घोरपडे सहकारी साखर कारखान्याशी संबंधित कथित शेअर घोटाळा प्रकरणात मुश्रीफांना दिलासा मिळालाय. शेतकऱ्यांना शेअर्स देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याच्या आरोप सोमय्यांनी मुश्रीफांवर केला होता. आरोपावरून हसन मुश्रीफ यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र कागलच्या कनिष्ठ न्यायालयात पोलिसांनी सी-समरी रिपोर्ट सादर केलाय. या रिपोर्टमध्ये मुश्रीफांविरोधात कोणताही पुरावा नसल्याचं स्पष्ट करण्यात आलं. परिणामी, मुंबई उच्च न्यायालयानं त्यांच्या विरोधातील गुन्हा रद्द करण्याच्या मागणीसंदर्भात दाखल याचिका निकाली काढली.




ज्या प्रकरणात हसन मुश्रीफ यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या गुन्ह्याबाबतची याचिका निकाली काढण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं दिले आहेत. त्यामुळे मुश्रीफांना मोठा दिलासा मिळालाय. दुसरीकडे मुश्रीफांना जेलमध्ये जाण्यासाठी बॅग भरून ठेवा असं सांगणाऱ्या सोमय्यांसाठी हा मोठा धक्का आहे. मात्र, शेवटी सोमय्यांनी सांगितलं तसंच झालं मुश्रीफ बॅग घेत थेट मंत्रिमंडळात सामिल झालेत.

एकीकडे उच्च न्यायालयानं दाखल गुन्ह्यातली याचिका निकाली काढलीय.. मात्र, दुसरीकडे हसन मुश्रीफांना कोणताही दिलासा मिळाला नसल्याचं समरजित घाटगे यांनी म्हटलंय. संताजी घोरपडे साखर कारखाना प्रकरणाचा कागल कोर्टात संबंधित खटला सुरूच असल्याचं समरजित घाटगेंनी म्हटलंय.

हसन मुश्रीफांना दिलासा नाही. कागल कोर्टात अजूनही खटला सुरूच आहे. हसन मुश्रीफ मविआत मंत्री असतानाच किरीट सोमय्यांनी त्यांच्यावर आरोपांचे बॉम्बगोळे डागले होते. संताजी साखर कारखान्यातील प्रकरण किरीट सोमय्यांनीच पुढे आणलं होतं..आणि त्याच आधारेच ईडीनेही मनी लॉन्डरिंगचा तपास सुरू केला होता. दरम्यान हा तपास सुरू झाल्यानंतर किरीट सोमय्यांनी मुश्रीफांना बॅग भरून जेलमध्ये जाण्यासाठी तयार रहा असा इशारा दिला होता.

**मुश्रीफांच्या घरासमोर मोठा राडा**

सोमय्यांच्या आरोपांनंतर हसन मुश्रीफांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर ११ मार्च २०२३ रोजी ईडीची टीम हसन मुश्रीफांच्या घरी देखील दाखल झाली होती. दरम्यान यानंतर मुश्रीफांच्या घरासमोर मोठा राडा झाल्याचं पाहायला मिळालं होतं. मुश्रीफांच्या समर्थकांनी त्यांच्या घरासमोर आंदोलन करत ईडीविरोधात देखील घोषणाबाजी केली होती. दरम्यान यावेळी हसन मुश्रीफ यांच्या पत्नीला देखील अश्रू अनावर झाले होते. आम्हाला गोळ्या घालून मारून टाका अशी संतप्त प्रतिक्रिया यावेळी त्यांनी दिली होती.

**११ मार्च २०२३ला ईडीची दुसऱ्यांदा धाड**

११ मार्च २०२३ रोजी सकाळी हसन मुश्रीफ यांच्या कागलमधील घरावर ईडीच्या पथकानं धाड टाकली होती. ज्यावेळी मुश्रीफांच्या घरी धाड पडली त्यावेळी हसन मुश्रीफ घरात नव्हते. घरात हसन मुश्रीफ यांच्या पत्नींसह काही महिला व मुलं होती. घरात सदस्य असतानाच ईडीकडून घराची झाडाझडती घेण्यात आली होती. दीड महिन्यातच दुसऱ्यांदा अशा पद्धतीने ईडीनं धाड टाकल्यानं मुश्रीफांच्या पत्नी सायरा मुश्रीफ या प्रचंड संतापल्या होत्या.

## भूमी अभिलेखांचे ऑनलाईन डिजिटलायझेशन करा

**■उल्हासनगर :** उल्हासनगर उप विभागीय कार्यलय आणि भूमी अभिलेख (सिटी सर्वे) विभागाचे ऑनलाईन डिजिटलायजेशन करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक सतरामदास जेसवानी यांनी ठाणे जिल्हाधिकारी समवेत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे केली आहे. भारत सरकारने विविध शासकीय विभागांमध्ये माहितीचे ऑनलाईन डिजिटलायझेशन करून एक क्रांती घडवून आणली आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला किंवा विभागाला आवश्यक ती माहिती आणि व्यवहार कोणत्याही वेळी सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध होऊ लागले आहेत. यामुळे अधिकारी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून होणारा गैरवापर रोखण्यासाठी अनेक त्रुटींना या डिजिटलायजेशनमुळे आळा बसला आहे. जेसवानी यांनी सांगितले कि १९७० पासून उल्हासनगर शहर हे एक निर्वासित छावणी म्हणून अस्तित्वात होते. येथे भारत सरकारमार्फत पाकिस्तानातून विस्थापित झालेल्या नागरिकांना ब्लॉक व बॅरक यामध्ये कन्व्हेअन्स डीड (सी.डी.) च्या माध्यमातून जागा वाटप करण्यात आल्या होत्या. त्या काळात संपूर्ण नोंदी प्रशासक, उल्हासनगर टाऊनशिप, उल्हासनगर यांच्या मार्फत नोंदवही आणि कागदांवर योजना तयार करून मॅन्युअल पद्धतीने करण्यात आल्या. नंतर या नोंदी उपविभागीय कार्यालय, उल्हासनगर टाऊनशिप, उल्हासनगर यांच्याकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. त्या नंतर काही काळाने सिटी सर्व्हे कार्यालय स्थापन झाले. ज्यांनी मालकांना प्रॉपर्टी काड्र्स वितरित केली. परंतु तेही केवळ प्रांत कार्यालयाने दिलेल्या नाव बदल पत्रावर आणि सब-रजिस्ट्रार कार्यालय, उल्हासनगरमध्ये नोंदणीकृत विक्री दस्तऐवजावर आधारित होते.



आजही उपविभागीय कार्यालय, उल्हासनगर टाऊनशिप, उल्हासनगर येथील बहुतांश अभिलेख (मालकांची रजिस्टर, सी.डी. ची प्रत इ.) खराब, फाटलेली अवस्थेत आहेत. हे दस्तावेज अद्याप स्कॅन करून ऑनलाईन उपलब्ध केले गेलेले नाहीत, त्यामुळे नागरिकांच्या मनात शंका, संभ्रम प्रश्न निर्माण होत आहेत. तसेच हे अभिलेख नसल्यामुळे कर्मचार्यांकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून बेकायदेशीर फेरफार होण्याची शक्यता जेसवानी यांनी व्यक्त केली आहे, कोणतीही अनधिकृत नोंद होऊ नये, सर्व भूमीमालकांच्या नोंदी पारदर्शक असाव्यात, याकरता उपविभागीय कार्यालय, उल्हासनगर ३ आणि सिटी सर्व्हे कार्यालय, उल्हासनगर ५ येथील सर्व अभिलेखांचे ऑनलाईन डिजिटलायझेशन करण्यात यावे अशी मागणी जेसवानी यांनी केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com